लोकमत

# सर्जनशीलता, नवनिर्मितीतून विकास शक्य : राऊत

## शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय परिषद

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** सर्जनशीलता आणि नवनिर्मितीतून विकास शक्य आहे. व्यूहरचनात्मक व्यवस्थापन आणि व्यावसायिकता आज सर्व क्षेत्रांत आवश्यक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत यांनी केले.

विद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापन विभागातर्फे शुक्रवारी (दि. १५) आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. 'उद्योजकता, नवनिर्मिती आणि विकासाच्या माध्यमातून मूल्यनिर्मिती' असा परिषदेचा विषय आहे.

ते म्हणाले, बाजारपेठेचे ज्ञान, नवनिर्मिती आणि क्षेत्रीय गरज यावरून व्यवसाय वाढविण्याचा प्रयत्न करावा. पाण्याचे दुर्भिक्ष सर्वत्र जाणवत आहे. भविष्यात हा प्रश्न गंभीर होणार आहे. यावर मात करून पुढील पिढ्यांसाठी पाणी उपलब्ध करणे आव्हान असणार आहे. यादृष्टीने व्यावसायिक मॉडेल व



तंत्रज्ञान यांचा प्रभावी वापर आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय सहभागी सदस्यांच्या वतीने रियाध (इराक) यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. ए. एम. गुरव यांनी प्रास्ताविक केले. एस. एस. महाजन यांनी स्वागत केले. मायाकुमारी पुरोहित यांनी सूत्रसंचालन केले. के. व्ही. मारूलकर यांनी आभार मानले. पहिल्या सत्रात प्रा. डॉ. एम. एम. अली यांनी विपणन प्रक्रियेतील नवनवीन आव्हाने विषयावर मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात उद्योजकांनी उद्योजकता व नवनिर्मिती याबाबतचे अनुभव सांगितले.

18 MAR 2019, लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘सोशल मीडियामुळे मानसिक आरोग्याचा ऱ्हास’

प्रतिनिधी, कोल्हापूर

**सोशल मीडियामुळे** सामाजिक आणि मानसिक आरोग्याचा ऱ्हास झाला आहे. यातून मोठ्या प्रमाणात माहिती संघर्ष होत आहे, असे प्रतिपादन माहिती तंत्रज्ञानाचे अभ्यासक डॉ. राजेंद्र पारिजात यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा पत्रकारिता व जनसंवाद विभाग, कोल्हापूर प्रेस क्लब आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर यांच्यावतीने आयोजित ‘निवडणुका आणि सोशल मीडिया’ या एकदिवसीय चर्चासत्रात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी सोलापूरच्या जनसंवाद विभागाचे प्रमुख डॉ. रविंद्र चिंचोलकर होते.

डॉ. पारिजात म्हणाले,की सोशल मीडियावरील माहिती नीट अर्थबोध होत नाही. बरीचशी माहिती भावनाप्रधान असते. त्यामुळे विचारशून्यता वाढते. विवेकाला थारा मिळत नाही. परिणामी सामाजिक आणि मानसिक आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

विभागीय माहिती संचालक सतीश लळीत यांनी आयोगाच्या सीव्हीजील या अॅपद्वारे निवडणुकीतील गैरप्रकाराविषयी नागरिक तक्रार करु शकतात. या तक्रारींचा निपटारा शंभर मिनिटांच्या आत करण्याची तरतूद आहे, असेही लळीत यांनी नमूद केले.

स्वागत विभागप्रमुख डॉ. निशा पवार यांनी केले. आभार विद्यापीठाच्या नेतृत्व विकास केंद्राचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी मानले.

# 'ज्ञानाचा उपयोग वंचितांसाठी करा'

इस्लामपूर : 'ज्ञानाच्या कक्षा रुंदावताना व्यावहारिक शहाणपण वाढवा. ज्ञानाचा उपयोग समाजातील उपेक्षित व वंचितांसाठी व्हावा. आपण मिळविलेल्या पदव्यांचा उपयोग समाजाचे भले करण्यासाठी करा,' असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

वाळवा तालुका शिक्षण संस्थेच्या मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालय, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय व वसंत कॉलेज ऑफ एज्युकेशन या तीन कॉलेजच्या पदवी प्रदान समारंभात ते बोलत होते. अॅड. बी. एस. पाटील अध्यक्षस्थानी होते. शिवाजी विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य अॅड. धैर्यशील पाटील उपस्थित होते. प्राचार्य डॉ. अंकुश बेलवटकर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्राचार्य डॉ. अरुण जाधव यांनी प्र. कुलगुरू डॉ. शिर्के यांना संस्थेच्या वतीने दिलेल्या सन्मान पत्राचे वाचन केले. अॅड. बी. एस. पाटील म्हणाले, 'संत ज्ञानेश्वरांच्या विचारांतील दुरितांचे तिमिर म्हणजे उपेक्षितांच्या जीवनातील अंधकार दूर करण्यासाठी शिक्षण हे प्रभावी माध्यम आहे. दुर्दम्य आशावाद व स्वतःवरील श्रद्धेतून विद्यार्थ्यांना मोठे यश मिळविता येईल.'



पदवी प्रदान समारंभात बोलताना शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.

या वेळी तिन्ही कॉलेजमधील विविध शाखांच्या ६० हून अधिक विद्यार्थ्यांना पदव्या प्रदान करण्यात आल्या. सुवर्णपदक प्राप्त विद्यार्थ्यांचा सन्मान झाला. शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश शहा, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक अॅड. चिमण डांगे, माजी नगराध्यक्षा प्रा. अरुणादेवी पाटील उपस्थित होते. प्राचार्य डॉ. अशोक पाटील यांनी आभार मानले.